महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०३ /२०२३ दि. ३०/१२/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी**, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कल्याण अंतर्गत स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत वल्लीपीर चौक ते महात्मा फुले चौक दरम्यान उड्डाणपूलाचे काम सुरू आहे. तसेच राज्य परिवहन आगाराचा पुनर्विकास करून सदर ठिकाणी बहुमजली इमारत उभारून उड्डाणपूलास जोडण्यात येणार आहे. या करिता एस.टी. स्टॅड ते रेल्वे रिझर्वेशन जवळील सार्वजनिक शौचालय पर्यत रस्ता नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिने रहदारीसाठी बंद करून वाहतुक इतर पर्यायी मार्गाने वळविणे व एकदिशा मार्ग करणे आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) छत्रपती शिवाजी महाराज चौक – पुष्कराज हॉटेल ( मोहंमद अली चौक )– दिपक हॉटेल दरम्यान ( वन वे ) एक दिशा मार्ग करण्यात येत आहे . दिपक हॉटेल येथून पुष्कराज हॉटेल ( मोहंमद अली चौक) मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना दिपक हॉटेल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने दिपक हॉटेल – एस.टी. स्टॅड इनगेट ते गुरूदेव हॉटेल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) छत्रपती शिवाजी महाराज चौक – पुष्कराज हॉटेल ( मोहंमद अली चौक ) – महात्मा फुले चौक दरम्यान ( वन वे ) एक दिशा मार्ग करण्यात येत आहे. महात्मा फुले चौक कडून पुष्कराज हॉटेल (मोहंमद अली चौक) मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना महात्मा फुले चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदची वाहने महात्मा फुले चौक – दिपक हॉटेल – एस.टी.स्टॅड इनगेट ते गुरूदेव हॉटेल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) एस.टी. स्टॅड इनगेट ते झुंजारराव मार्केट ते गुरूदेव हॉटेल दरम्यान ( वन वे ) एक दिशा मार्ग करण्यात येत आहे. गुरूदेव हॉटेलकडून कल्याण स्टेशनकडे व झुंजारराव मार्केटकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना गुरूदेव हॉटेल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने गुरूदेव हॉटेल – छत्रपती शिवाजी महाराज चौक – पुष्कराज हॉटेल ( मोहंमद अली चौक ) मार्गे मार्गे इच्छित स्थळी जातील. अथवा झुंजारराव मार्केट येथे जाणारी वाहने डि मार्ट आर्चीज गॅलरीगल्ली मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) आर्चीज गॅलरी – साधना हॉटेल – नाना नानी पार्क (मागील बाजु) ते टेनिस कोर्ट (केडीएमसी) दरम्यान ( वन वे ) एक दिशा मार्ग करण्यात येत आहे. टेनिस कोर्टकडुन साधना हॉटेलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना टेनिस कोर्ट येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदची वाहने कराची मेडिकल – आर्चिज गॅलरी गल्ली मार्गे इच्छित स्थळी जातील.

**दुहेरी मार्ग –** महात्मा फुले चौक ते दिपक हॉटेल हा एकदिशामार्ग रद्द करून दुहेरी वाहतूक सुरू करण्यात येत आहे.

**प्रवेश बंद –** ५) सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना सुभाष चौक येथून कल्याण स्टेशनकडे जाण्यासाठी **सुभाष चौक येथे प्रवेश** बंद करण्यात येत आहे. तसेच कल्याण स्टेशन कडे जाणा–या सर्व प्रकारच्या खाजगी बसेसना महात्मा **फुले चौक येथे प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सुभाष चौक येथून कल्याण स्टेशनकडे जाणारी जड अवजड वाहने ही प्रेम ऑटो सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील. तसेच सर्व खाजगी बसेस महात्मा फुले चौक येथे यु टर्न घेवून सुभाष चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना वल्लीपीर ते महात्मा फुले चौक दरम्यान उड्डाणपूलाचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**<u>प्रति,</u>**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u>** :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**<u>प्रत</u>** :– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.</u>
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– <u>सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग.</u>
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.